# दक्षता यंत्रणा / विसल ब्लोअर धोरण

## 1. प्रास्ताविकः

व्यवसायिकता, प्रामाणिकपणा आणि नैतिक वर्तनाचे सर्वोच्च मानदंड स्विकारुन आपला व्यवसाय आणि कारभार संचालित करण्यास कंपनी वचनबद्ध आहे. सर्वच कर्मचाऱ्यांसाठी सुरक्षित आणि नैतिक कार्य संस्कृति पुरविण्यासाठी देखील कंपनी वचनबद्ध आहे.

कंपनी कायदा, 2013च्या कलम 177च्या उप-कलम 9च्या तरतुदी आणि कंपनी (मंडळाची बैठक आणि त्यांचे अधिकार) नियम 2014च्या नियम 4 अनुसार, सर्व सूचिबद्ध कंपन्यांनी एक दक्षता यंत्रणा स्थापित करणे अनिवार्य आहे, जेणेकरुन त्यांचे संचालक आणि कर्मचारी अनैतिक वर्तन किंवा अयोग्य कार्याच्या कोणत्याही प्रसंगाची खबर देऊ शकतील.

तसेच 1 ऑक्टोबर, 2014 पासून तत्कालिन लिस्टींग कराराच्या सुधारित परिच्छेद 49 नुसार आणि आता सेबी (एलओडीआर) नियम, 2014च्या नियम 22 अनुसार, सर्व सूचिबद्ध कंपन्यांनी अनैतिक वर्तन, प्रत्यक्ष किंवा संशयास्पद घोटाळा किंवा कंपनीच्या आचार संहितेचे उल्लंघन यांच्याबाबत चिंता नोंदविण्यासाठी संचालक आणि कर्मचाऱ्यांसाठी “विसल ब्लोअर धोरण” तयार करणे आवश्यक आहे.

कर्मचाऱ्यांची ओळख सुरक्षित राखून कंपनीतील गंभीर अनियमिततांबाबत प्रश्न उपस्थित करण्यासाठी त्यांना एक चौकट पुरविण्याच्या उद्देशाने हे धोरण तयार करण्यात आले आहे.

## 2. व्याख्याः-

या धोरणामध्ये वापरलेल्या काही मुख्य शब्दांच्या व्याख्या खाली दिल्या आहेतः

**"ऑडिट समिती"** याचा अर्थ कंपनी कायदा, 2013चे कलम 117 आणि तत्कालिन लिस्टींग करार सोबत सहवाचन सेबी (एलओडीआर) नियम, 2015 च्या नियम 18च्या परिच्छेद 49 अनुसार कंपनीच्या संचालक मंडळाद्वारे स्थापित ऑडिट समिती

i. "**सक्षम प्राधिकरण**" याचा अर्थ कंपनीचा मुख्य कार्यकारी अधिकारी आणि यामध्ये सदर धोरणाखाली वेळोवेळी आपले अधिकार प्रदत्त केलेली (ल्या) व्यक्ति समाविष्ट राहतील.

ii. "**कर्मचारी**" म्हणजे कंपनीच्या रोजगारातील संचालकांसह कंपनीचा प्रत्येक कर्मचारी (मग तो भारतात किंवा परदेशात काम करत असेल).

iii. "**अन्वेषक**" म्हणजे संरक्षित प्रकटनाच्या तपासामध्ये सहाय्यासाठी सक्षम अधिकाऱ्याद्वारे प्राधिकृत, नियुक्त, सल्लाकृत किंवा संपर्क केलेल्या व्यक्ति.

iv. "**संरक्षित प्रकटन**" म्हणजे  चांगल्या इच्छेने केलेली कोणतीही सूचना जी अनैतिक किंवा अयोग्य कामाचा पुरावा प्रकट करते किंवा दाखवून देते.

v. "**प्रयोक्ता**" म्हणजे एक व्यक्ति किंवा व्यक्तिंचा समूह ज्यांच्याविरुद्ध किंवा संदर्भात एक संरक्षित प्रकटन करण्यात आले आहे किंवा एखाद्या तपासाच्या दरम्यान पुरावा गोळा करण्यात आला आहे.

vi. **<u>अनैतिक किंवा अयोग्य कार्य</u>** म्हणजे मर्यादेविना अर्थ राहीलः

- अ) अधिकाराचा गैरवापर.
- ब) कंत्राटाचा भंग.
- क) कंपनीचा डाटा/नोंदींचा गैरवापर.
- ड) फौजदारी/दिवाणी स्वरुपाची कोणतीही बेकायदेशीर कृती.
- इ) घोटाळा किंवा संशयित घोटाळ्यासह, हेतुपुरस्सर वित्तीय गैरप्रकार.
- फ) संपूर्ण किंवा हेतुपुरस्सर निष्काळजीपणा ज्यामुळे आरोग्य, सुरक्षितता आणि पर्यावरण यांना मोठ्या आणि विशिष्ट प्रमाणात धोका होणे.
- ग) अन्य संचालक/व्यवसाय भागिदार/कर्मचारी किंवा कमकुवत प्रौढ यांच्यासोबत गैरवर्तन (उदा. शारीरिक, लैंगिक, मानसिक किंवा वित्तीय गैरवापर, पिळवणूक याद्वारे).
- ह) कंपनीचा निधी/मालमत्ता वाया घालवणे/गैरप्रकार करणे.
- य) कंपनीच्या पॉलिसींचे उल्लंघन
- ज) गोपनीय/प्रोप्रायटरी माहितीचा प्रसार.

**viii)** **"विसल ब्लोअर"** म्हणजे या धोरणाखाली एक संरक्षित प्रकटन करणारी एखादी व्यक्ती.

### 3. <u>पात्रताः</u>

या धोरणाखाली संरक्षित प्रकटन करण्यासाठी कंपनीचे सर्व कर्मचारी पात्र आहेत. ही संरक्षित प्रकटने कंपनीच्या किंवा तिच्या कोणत्याही उपकंपनीच्या बाबींशी निगडीत असू शकतात.

### 4. <u>अपात्रताः</u>

अ. याठिकाणी नमूद केल्यानुसार कोणत्याही प्रकारच्या पक्षपाती वागणुकीपासून अस्सल विसल ब्लोअर्सना संपूर्ण संरक्षण देण्याची खात्री केली जाईल, तथापि या संरक्षणाचा कोणताही गैरवापर केल्यास शिस्तभंगाची कारवाई केली जाऊ शकते.

ब. या धोरणाखाली संरक्षण याचा अर्थ विसल ब्लोअरने केलेले प्रकटन खोटे आहे किंवा *वाईट* उद्देशाने आहे हे माहिती असूनही त्यातून उद्भवलेल्या शिस्तभंगाच्या कारवाईपासून संरक्षण असा होत नाही.

क. कोणतेही संरक्षित प्रकटन करणारे विसल ब्लोअर्स, जे नंतर *वाईट किंवा बदनामीकारक* असल्याचे आढळून आले आहे किंवा असे विसल ब्लोअर्स जे 3 किंवा अधिक संरक्षित प्रकटने करतील, जी नंतर खोडसाळ, निराधार किंवा चांगल्या इच्छेखेरीज अन्य स्वरुपाची असल्याचे आढळून आले असेल, त्यांना या धोरणाखाली पुढील संरक्षित प्रकट्ने दाखल करण्यापासून अपात्र ठरवले जाईल आणि ते शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र ठरतील.

### 5. <u>प्रक्रियाः</u>

सर्व संरक्षित प्रकटने ही तक्रारदाराने त्याला माहिती मिळाल्यानंतर कमाल 30 दिवसांच्या आत, शक्य तितक्या लवकर लेखी स्वरुपात दिली पाहिजेत आणि ती एकतर टाईप केलेली किंवा वाचता येईल

अशी इंग्लिश किंवा हिंदी किंवा विसल ब्लोअरच्या नोकरीच्या जागेतील प्रादेशिक भाषेत हाताने लिहिलेली असावीत.

अनामिक प्रकटने, एक नियम म्हणून, स्विकारली जाणार नाहीत.

संरक्षित प्रकटन तक्रारदाराच्या स्वाक्षरीने एका आवरण पत्राखाली एका बंद आणि सुरक्षित लिफाफ्यात सादर करावीत आणि त्यांच्यावर "**विसल ब्लोअर धोरणाखाली संरक्षित प्रकटन**" असे लिहावे किंवा ईमेलद्वारे "**विसल ब्लोअर धोरणाखाली संरक्षित प्रकटन**" असा विषयासह पाठवावीत. जर तक्रारीवर शब्दांकन नसेल आणि वरीलप्रमाणे बंदिस्त नसेल तर, या धोरणाखाली नमूद केल्यानुसार विसल ब्लोअरला संरक्षण देणे शक्य होणार नाही.

सर्व संरक्षित प्रकटने कंपनीच्या सक्षम अधिकाऱ्याकडे किंवा अपवादात्मक प्रकरणी ऑडिट समितीच्या अध्यक्षाकडे पाठवावीत.

सक्षम अधिकाऱ्याचा संपर्क तपशील खालीलप्रमाणे आहेः

| | |
|---|---|
| **नाव आणि पत्ता** | श्री. भिषम वढेरा,<br>मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>ऑमॅक्स स्क्वेअर, प्लॉट क्र. 14,<br>जसोला डिस्ट्रीक्ट सेंटर, जसोला,<br>नवी दिल्ली-110025 |
| **ई-मेल आयडी** | chatwithbhisham-gpi@modi.com |

सक्षम अधिकारी आवरण पत्र विलग करेल आणि केवळ संरक्षित प्रकटन तपासणीसाठी अन्वेषकांकडे पाठवेल.

## 6. <u>तपासणी आणि अन्वेषकांची भूमिकाः</u>

अ) उपस्थित केलेल्या प्रकरणी अंतर्गत तपास केला जाईल किंवा विसल ब्लोअरने उपस्थित केलेल्या समस्येच्या स्वरुपानुसार बाह्य अन्वेषकाकडे पाठवले जाईल.

ब) सक्षम अधिकाऱ्याने तपास करण्याचा घेतलेला निर्णय हा स्वतःहून एक आरोप नाही आणि ही एक तटस्थ सत्य-शोधन प्रक्रिया समजायची आहे. या तपासाचा निष्कर्ष विसल ब्लोअरच्या निष्कर्षाला समर्थन करणार नाही की एक अयोग्य किंवा अनैतिक कृती करण्यात आलेली होती.

क) एखाद्या औपचारिक तपासाच्या प्रारंभी प्रयोक्त्यांना आरोपांची सामान्यतः माहिती दिली जाईल आणि तपासाच्या दरम्यान आपली बाजू मांडण्याची संधी त्यांना राहील.

ड) तपासाच्या दरम्यान सक्षम अधिकारी किंवा कोणत्याही अन्वेषकासोबत त्या प्रमाणापर्यंत सहकार्य करण्याचे प्रयोक्त्यांचे कर्तव्य राहील की अशा सहकार्यातून लागू कायद्यांखाली उपलब्ध स्वयं-संरक्षणासोबत तडजोड होणार नाही.

इ) अन्वेषक आणि/किंवा ऑडिट समितीचे सदस्य आणि/किंवा विसल ब्लोअर यांच्याखेरीज, त्यांच्या पसंतीची व्यक्ति किंवा अनेक व्यक्तिंसोबत सल्लामसलत करण्याचा अधिकार प्रयोक्त्यांना राहील. तपासणी कार्यवाहीत आपली बाजू मांडण्यासाठी स्वखर्चाने वकील नेमण्याचं स्वातंत्र्य प्रयोक्त्यांना कोणत्याही वेळी राहील. परंतु, प्रयोक्त्याच्या विरुद्ध केलेले आरोप ग्राह्य धरण्यायोग्य नसतील तर, असा खर्च भरुन देण्यास कंपनीला कारण असू शकेल.

फ) तपासाच्या निष्कर्षाची माहिती कळण्याचा अधिकार प्रयोक्त्यांना राहील.

ग) संरक्षित प्रकटन प्राप्त झाल्यापासून 45 दिवसांच्या आत सामान्यतः तपास पूर्ण केला जाईल आणि 45 दिवसांच्या पुढे कोणताही विलंब झाल्यास तपासणी अहवालात त्याचं स्पष्टीकरण दिलं जाईल.

अन्वेषकांची भूमिका खालीलप्रमाणे राहीलः

i. अन्वेषकांनी सत्यशोधन आणि विश्लेषणासाठी एक प्रक्रिया संचालित कऱण्याची आवश्यकता राहील.

ii. सर्व अन्वेषक वस्तुतः आणि कल्पनेनुसार स्वतंत्र आणि निष्पक्ष राहतील.

iii. अन्वेषकांचे कर्त्तव्य राहील की ते निष्पक्ष, लक्ष्यित, सखोल, नैतिक वर्तन, आणि कायदेशीर आणि व्यवसायिक मानदंडांचे पालन करणारे असतील.

iv. तपासाचा आरंभ सक्षम अधिकाऱ्यांना एक प्राथमिक आढावा घेतल्यानंतरच सुरु केला जाईल.

v. अन्वेषक सदैव सक्तीने गोपनीयता पाळतील.

vi. अन्वेषक चौकशीचा निष्कर्ष काढतील आणि योग्य कृतीचा क्रम सांगतील.

vii. अन्वेषक आपला अहवाल सक्षम अधिकाऱ्याकडे सादर करतील.

## 7. <u>निर्णयः</u>

एखाद्या तपासातून निर्णय निघाला की अयोग्य किंवा अनैतिक वर्तन झाले आहे, तर सक्षम अधिकारी लागू सेवा नियमाच्या तरतुदीखाली शिस्तभंगाची किंवा दुरूस्तीची कारवाई घेण्यास आणि/किंवा लागूयोग्य वैधानिक तरतुदींखाली कृती सुरु करण्यास कंपनीच्या व्यवस्थापनाला शिफारस करेल.

या धोरणानुसार एका तपासणीच्या निष्कर्षांच्या परिणामी प्रयोक्त्याविरुद्ध सुरु केलेली कोणतीही शिस्तभंगाची किंवा उपायात्मक कारवाई लागूयोग्य कर्मचारी किंवा कर्मचारी वर्तन आणि शिस्तीच्या प्रक्रियांच्या अनुसार राहील.

जर सक्षम अधिकाऱ्याला वाटले की संबंधित संरक्षित प्रकटनावर कोणतीही पुढील कारवाई करण्याची गरज नाही असे तपासातून निष्पन्न झाले आहे तर, तो तसे लेखी नोंदवेल.

## 8. <u>अहवालः</u>

या धोरणाखाली प्राप्त तक्रारींच्या संख्या, केलेला तपास आणि त्यांचे निष्कर्ष यांच्यासह एक तिमाही अहवाल, ऑडिट समितीच्या समोर मांडला जाईल.

सक्षम अधिकाऱ्याने केलेली कोणतीही कारवाई किंवा निर्णयाचा आढावा घेण्याचा अधिकार ऑडिट समितीला राहील.

## 9. संरक्षणः

एखाद्या विसल ब्लोअरने या धोरणाखाली एक संरक्षित प्रकटन केले म्हणून त्याला/तिला भेदभावात्मक वागणूक दिली जाणार नाही. कंपनी, एक पॉलिसी म्हणून, विसल ब्लोअर्सच्या विरुद्ध कोणत्याही प्रकारचा भेदभाव, छळ, बदला किंवा कोणतीही अन्य पक्षपाती रोजगार प्रथा अवलंबिण्याचा धिःक्कार करते.

संरक्षित प्रकटन केल्याच्या परिणामी विसल ब्लोअरला आलेल्या कोणत्याही अडचणी कमी करण्यासाठी कंपनी उपाय करेल.

कायद्याने मंजूर आणि शक्य तितक्या प्रमाणात विसल ब्लोअरची ओळख गोपनीय ठेवण्यात येईल.

सदर तपासात सहाय्य करणाऱ्या कोणत्याही अन्य कर्मचाऱ्याला विसल ब्लोअरच्या इतक्याच प्रमाणात संरक्षित केले जाईल.

## 10. गोपनीयताः

सदर धोरणाखाली उपस्थित केलेल्या सर्व चिंता आणि समस्या एक संपूर्ण, निष्पक्ष आणि प्रभावी तपासाच्या संचालनासाठी आवश्यक प्रमाणात एका गोपनीय पद्धतीने हाताळल्या जातील.

विसल ब्लोअर, प्रयोक्ता, सक्षम अधिकारी, ऑडिट समितीचे सदस्य, अन्वेषक आणि या प्रक्रियेत सहभागी कोणीही या प्रकरणाची संपूर्ण गोपनीयता/गुप्तता राखेल.

कोणीही वरील गोष्टींचे पालन करत नसल्याचे आढळून आल्यास, त्याला/तिल्या योग्य त्या शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र धरण्यात येईल.

## 11. कागदपत्रे जतन करणेः

सर्व लेखी संरक्षित प्रकटने किंवा त्याच्या तपासाशी निगडीत निष्कर्षांसोबत कागदोपत्री केलेल्या नोंदी कंपनीद्वारे किमान सात वर्षे जतन करुन ठेवली जातील.

## 12. अप्रकाशित किंमत संवेदनशील माहिती ("यूपीएसआय") बाहेर फुटल्यास विसल ब्लोईंग

i. यूपीएसआय बाहेर फुटण्याचा कोणताही प्रसंग एखाद्या विसल ब्लोअरच्या पहिल्या थेट अनुभवाच्या आधारे नसावा. तो कोणत्याही दुय्यम, अविश्वसनीय स्रोतावर आधारित असावा जसे की ग्रेपवाईन किंवा कोणत्याही अन्य स्वरुपातील औपचारिक सूचना.

ii. विसल ब्लोअर यूपीएसआयच्या गळतीची माहिती सक्षम अधिकाऱ्याला ईमेलद्वारे त्यांच्या ई-मेल आयडीवर "लीक ऑफ यपीएसआय" अशा विषयाखाली कळवू शकतो.

iii. या सूचनेच्या आधारे, सक्षम अधिकारी चौकशी सुरु करण्यापूर्वी या सूचनेच्या अस्सलपणाबाबत तपासणी करेल.

iv. यूपीएसआयच्या गळतीबाबत माहितीचा अस्सलपणा पडताळून पाहिल्यावर लगेचच, सक्षम अधिकारी, यूपीएसआयच्या गळतीच्या प्रसंगात चौकशीसाठी प्रक्रियेसाठी धोरणाखाली नेमून दिलेल्या पद्धतीचे पालन करेल.

## 13. सुधारणाः

कोणतेही कारण न देता, कोणत्याही वेळी, संपूर्णपणे किंवा अंशतः या धोरणात दुरूस्ती किंवा बदल करण्याचा अधिकार कंपनीने राखून ठेवला आहे. या धोरणातील कोणताही दुरूस्ती कंपनीच्या संचालक मंडळाने मान्य केलेल्या आणि कंपनीच्या वेबसाईटवर प्रदर्शित केल्याच्या दिनांकापासून लागू राहील.

मंडळाच्या आदेशाने

| | |
|---|---|
| हस्ता./- | हस्ता./- |
| आर. ए. शाह | के.के. मोदी |
| (अध्यक्ष) | (व्यवस्थापकीय संचालक) |